# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. एमडीएफ/ओडी/८६०/जन, दि.२८.०६.२०२२

विषय:- सार्वजनिक गणेशोत्सव २०२२.
संदर्भ:- १)एमडीएफ/३४८३/जन दि. २३/०३/२०२२
२) MGC/F/7019 dt. 27/06/2022

कृपया उपरोक्त संदर्भक्र. (१) च्या परिपत्रकामधील अट क्र. (१२) पहावी. मागील ३ वर्षाची आकडेवारी / आलेख विचारात घेता बृहन्मुंबईत अंदाजे २,२२,५९० घरगुती गणपती व १२,६२१ सार्वजनिक गणपती मूर्त्यांची पूजा करण्यात आली.

वरील संदर्भ क्र. (१) परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर अनेक मूर्तीकारांनी या कार्यालयात शाडूच्या मूर्ती बनविण्याकरीता कमी कालावधी असल्याचे निवेदन केले आहे. सदर निवेदनात प्राधान्याने (i) शाडूच्या मूर्त्यांना सुकण्याकरीता जास्त कालावधी लागतो (ii) इतक्या मोठ्या संख्येत शाडूच्या मूर्त्या बनविण्याकरीता सहजपणे मोठ्या प्रमाणात शाडू प्राप्त न होणे (iii) शाडूच्या मूर्ती तयार करणे जास्त खर्चिक आहे (iv) त्यामुळे सहसा गणेशभक्त जास्त किंमतीची मूर्ती विकत घेणार नाहीत (v) मूर्ती बनविण्याकरीता मोठ्या जागा उपलब्ध करुन देणे इत्यादी बाबींचा समावेश होता.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन तसेच गणेशोत्सव नजीकच्या कालावधीत असल्याने अपुरा वेळ विचारात घेता, खालील सुधारीत अटी देण्यात येत आहेत.

(अ) त्या ऐवजी विभाग स्तरावर व मध्यवर्ती यंत्रणामार्फत नागरीकांना आवाहन करण्यात यावे की त्यांनी सन २०२२ करीता स्वखुशीने POP मूर्ती खरेदी करु नये व त्या ऐवजी पर्यावरण पुरक साहित्याची मूर्ती खरेदी करावी.

(ब) POP ची मूर्ती खरेदी केली तर त्याची उंची २ फूटापर्यंत स्वखुशीने मर्यादीत ठेवावी.

(क) घरगुती गणेश भक्तांनी सदर POP मूर्तीचे विसर्जन नजीकच्या कृत्रिम तलावात करणे बंधनकारक आहे.

(ड) तसेच उपरोक्त कारणामुळे POP मूर्ती बनवण्याची सवलत सन २०२२ मध्ये देण्यात येत आहे व सन २०२३ पासुन गणेश मूर्ती बनविण्यास सक्त बंदी असणार आहे याची जाणीव मूर्तीकारांना व मूर्ती विकत घेणाऱ्या गणेशभक्तांना असावी याची मूर्तीकारांनी नोंद घ्यावी.
तसेच, सोबत जोडलेले हमीपत्र मूर्तीकारांकडून घ्यावे.

उप आयुक्त (परि.-दोन)

**सहाय्यक आयुक्त (ए ते टी विभाग)**

**प्रत माहितीसाठी:-**
**सह आयुक्त / उप आयुक्त (परि-१, ३, ४, ५, ६, ७)**, मा.महोदय,
**मा. अतिरिक्त आयुक्त (पुर्व उपनगरे)**, मा. महोदया,
**मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त**, मा. महोदय,

उप आयुक्त(परि.-दोन)

# हमीपत्र

मी/आम्ही श्री.............................. , ........................ गणेश मूर्तीकार संघ असे हमी देतो की,

(१) सन २०२३ मध्ये POP गणेश मूर्ती बनविण्यास पूर्णपणे बंदी असल्याची बाब मला/आम्हाला मान्य आहे.

(२) या वर्षी म्हणजेच २०२२ साली POP गणपती मूर्तींची विक्रि करतांना सदर घगुती मूर्तींचे विसर्जन २०२२ मध्ये सक्तीने कृत्रीम तलावात करण्यासंबंधी आमच्याकडून गणेश भक्तांना कल्पना देण्यात येईल.

(.....................................)

नाव श्री.............................

गणेशोत्सव मंडळ................